प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग**, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001

**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001

फोन/Phone: 022-22660502

वेबसाइट : www.rbi.org.in

Website : www.rbi.org.in

ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

जुलै 15, 2019

**भारतीय रिझर्व्ह बँकेकडून, भारतीय स्टेट बँकेवर आर्थिक दंड लागु**

भारतीय रिझर्व्ह बँकेने(आरबीआय), आदेश दि. जुलै 15, 2019 अन्वये, भारतीय स्टेट बँकेवर ती बँक) रु.70 दशलक्ष दंड लागु केला असून, तो दंड, आरबीआयने पुढील बाबींवर दिलेल्या सूचनांचे/निर्देशांचे अनुपालन न केले गेल्याने लावण्यात आला आहे - (1) उत्पन्न ओळख व ॲसेट वर्गीकरण आयआर एसी) नॉर्म्स, (2) चालु खाती उघडणे व चालविणे ह्यासाठीची आचार संहिता आणि सेंट्रल डिपॉझिटरी ऑफ इन्फर्मेशन ऑन लार्ज क्रेडिट्स सीआरआयएलसी) आणि 3) फसवणुक जोखमींचे व्यवस्थापन व फसवणुकी कळविणे. बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या हा अधिनियम) कलम 49 (4) (आय) व 51 (1) सह वाचित, कलम 47 अ 1) (क) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आरबीआयने हा दंड लावला आहे.

ही कारवाई, विनियामक त्रुटींवर आधारित असून, वरील बँकेने तिच्या ग्राहकांशी केलेले व्यवहार किंवा करार ह्यांचा वैधतेशी संबंधित नाही.

**<u>पार्श्वभूमी</u>**

वरील बँकेच्या, मार्च 31, 2017 रोजी असलेल्या वित्तीय स्थिती संबंधाने केलेल्या वैधानिक तपासणीत, इतर बाबींसह दिसून आले की वरील बँकेने, पुढील बाबींवर आरबीआयने दिलेल्या सूचनांचे पालन केलेले नाही - आयआरएसी नॉर्म्स, इतर बँकांबरोबर ग्राहकांची माहिती शेअर करणे, सीआरआयएलसी वर माहिती कळविणे, फसवणुक-जोखीम व्यवस्थापन व फसवणुकींचे वर्गीकरण व अहवाल पाठविणे. तपासणी अहवाल व इतर संबंधित कागदपत्रे ह्यांच्या आधारावर, आरबीआयने दिलेल्या सूचनांचे अनुपालन न केल्याबद्दल दंड का लावण्यात येऊ नये ह्याची कारणे देण्यास वरील बँकेला एक नोटिस पाठविण्यात आली होती. ह्यावर वरील बँकेने दिलेले उत्तर व वैय्यक्तिक सुनावणीत केलेली सादरीकरणे विचारात घेऊन आरबीआयने निष्कर्ष काढला की, आरबीआयच्या सूचनांचे अनुपालन न केले गेल्याचे वरील दावे सिध्द होत असून त्यासाठी आर्थिक दंड लावणे आवश्यक आहे.

**योगेश दयाल**

मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2019-2020/154**